# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय जळगांव

**(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, जळगांव ४२५ ००२.

✆ ०२५७-२२८१५२२ (कार्या.)

Web : www.gcoej.ac.in

Email : principal.gcoejalgaon@dtemaharashtra.gov.in


सत्यमेव जयते

---

जा.क्र.शाअमज/लेखा/२०२२/ 428 दिनांक:- 8 FEB 2022

**परिपत्रक-**

विषय- प्राप्तीकराचे विवरणपत्र भरुन सादर करणे बाबत.... (वित्तीय वर्ष २०२१-२२)

संस्थेतील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, माहे फेब्रुवारी-२०२२ च्या वेतन देयकासोबत प्राप्तीकराचे विवरणपत्र जोडणे आवश्यक आहे. ती प्रत्येकाची वैयक्तिक जबाबदारी आहे. सन २०२१-२२ या वर्षासाठी आवश्यक असलेले **आयकराबाबतचे दोन नमुने म्हणजेच (1) Old Regime (2) New Regime** असे तयार करण्यात आले असून ते महाविदयालयाच्या संकेतस्थळावरील **Download section** मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्यापैकी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी आपल्या स्वत:ला जो नमुना लागु असेल त्याच नमुन्याचा उपयोग करावयाचा आहे. कोणत्याही परिस्थितीत दोन नमुने भरुन दयायचे नाही. नियमीत वेतन (वार्षिक) विवरणपत्र संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच नियमीत वेतनाबाबत (वार्षिक) आपण आपल्या वैयक्तीक आयडी वरुन वेतनाचा तपशिल घ्यावा. (gcoej.ac.in वरील ई-मेलवरुन)

तसेच असे कळविण्यात येते की जे अधिकारी / कर्मचारी **संस्थेबाहेर संस्थांना (80G अंतर्गत) डोनेशन / देणगी देणार असतील तर** अशा देणगीचा विचार संस्थास्तरावरील आयकर विवरणपत्रात दर्शविण्यात येवू नये. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात फरकाची रक्कम प्राप्त झाली असेल ती रक्कम आयकर विवरणपत्रासोबत जोडावयाच्या वेतन विवरणपत्रात स्वतंत्रपणे (Arrears) म्हणून दर्शवावी. तसेच ज्या वर्ग-३ च्या कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नतीचा फरक देण्यात आला आहे त्याबाबतची माहिती कार्यालयातून घेण्यात यावी.

वेतना व्यतीरिक्त मिळणा-या मानधनाबाबतची यादी देखिल वर नमुद केल्याप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल यास्तव सर्व अधिकारी / कर्मचारी यांना कळविण्यात येते की वर नमुद केलेल्या सर्व सुचना विचारात घेवून सर्वांनी आयकर विवरणपत्र भरुन दयावे. आयकर विवरणपत्रात दर्शविलेल्या प्रत्येक बचतीच्या कागदपत्रांच्या दोन प्रतीत संच तयार करुन विवरणपत्रास जोडावे. अपेक्षित बचत असल्यास ३१ मार्च २०२२ पर्यंत करणार असल्यास **त्याबाबतचे हमीपत्र जोडणे आनिवार्य आहे.** तद्नंतर सदरची बचत त्याप्रमाणे करण्यात येईल त्याची प्रत कार्यालयास न चुकता सादर करावी. अन्यथा ते देतांना विचारात घेतले जाणार नाही. **घरभाडे सवलत घेण्याकरीता घरमालकाचा पॅन नंबर भाडेकरारपत्र व पावती (१२ महीन्याच्या) जोडण्यात याव्यात.**

सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी उपरोक्त सुचनांप्रमाणे **आयकर विवरणपत्र दिनांक २२/०२/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत कार्यालयास न चुकता सादर करावे** जे अधिकारी / कर्मचारी दिलेल्या मुदतीत विवरणपत्र जमा करणार नाहीत यांचे माहे फेब्रुवारी २०२२ चे वेतन हे नियमित वेतन देयकासोबत काढण्यात येणार नाही तसेच त्यांचे त्यानंतरचे देखिल वेतन विहीत मुदतीत काढता येणार नाही याची नोंद घ्यावी.

(प्रा. डॉ. ग. मा. मळवटकर)
प्र.प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महा. जळगांव

प्रत-

१. सर्व विभागप्रमुख यांना माहीती व पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव.
   २/ त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक त्यांनी आपल्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे व कर्मचा-यांची स्वाक्षरी केलेली प्रत कार्यालयात जमा करावी.
२. श्री.एस.एस.शहाणे, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना माहीती व पुढील कार्यवाहीसाठी.
   २/ त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधितांचे आयकर विवरणपत्र तपासून स्वाक्षरीसाठी वरिष्ठांकडे सादर करावे.
३. प्रबंधक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
   २/ त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आयकर विवरणपत्र व्यवस्थित तपासून पुढील कार्यवाहीसाठी संबंधितांना दयावे.
४. श्री. आर.ए.दळवी, डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी gcoej.ac.in वरील ई-मेलवर पाठवावे. (सर्व अधिकारी/कर्मचारी)